## निशाणी क्र. ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञावली ३९ नियम १,२ नुसार प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये व बेकायदेशीररित्या नवीन रस्ता तयार करु नये यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व निशाणी क्रमांक १८ ला असलेले म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना दाव्याचे समन्स बजावून देखील ते गैरहजर राहिले. सबब त्यांच्या विरुद्ध सदर प्रकरण एकतर्फा चालवण्यात आले आहे.

३. उभय पक्षकारांनी केलेली कथने, सादर युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन माझे विचारार्थ खालील वादमुद्दे निष्पन्न झाले. त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहेः

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे वतीने सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | होकारार्थी |
| २. | सोयीचा समतोल वादीच्या वतीने आहे का ? | होकारार्थी |
| ३. | प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारण मिमांसा

## मुद्दा क्र. १ करीता

४. दावा मिळकत वादीच्या मालकीची वहिवाटीची आहे याबाबत उभय पक्षकारांमध्ये वाद दिसून येत नाही. दावा मिळकतीचा पूर्वीचा जुना गट क्रमांक ३०६६ होता व पूर्वीचा सर्व्हे क्रमांक ५२४ होता, या पूर्वीच्या जमीनीचे क्षेत्र ३२ आर होते असे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते. तथापि, एकत्रिकरण योजने अंतर्गत सर्व्हे क्रमांक ५२४ व सर्व्हे क्रमांक ११ चा मिळून गट क्रमांक ३०६६ झालेला आहे असे एकत्रिकरणाच्या उता–यावरुन दिसून येते. फेरफार क्रमांक ६३७ वरुन मुळ ३२ आर क्षेत्राबाबत बदल होवून त्याचे क्षेत्र ३८ आर झालेले आहे असे दिसून येते. अशा प्रकारे वादीच्या मालकीचे वहिवाटीचे दावा मिळकतीचे ३८ आर क्षेत्र आहे असे स्पष्ट होते.

५. प्रतिवादी यांनी तहसिलदार यांच्या समोर दावा मिळकत व सर्व्हे क्रमांक १ च्या सरबांधाला त्यांच्या गट क्रमांक २३०९ मध्ये येणे जाण्याचा रस्ता असून वादीने हा रस्ता बंद केला आहे व तो रस्ता खुला होवून मिळावा यासाठी मामलेदार ॲक्ट १९०६ चे कलम ५ प्रमाणे अर्ज क्रमांक १४/२०२१ दाखल केला आहे असे दिसून येते. या प्रकरणाच्या तारखेच्या वेळी प्रतिवादी यांनी वादीस दावा मिळकतीमधून दांडगाव्याने रस्ता करण्याची भाषा केली आहे व रस्ता करण्यास अडथळा केल्यास मारहाण करण्याची व जिवे मारण्याची धमकी दिली आहे असे वादीचे म्हणणे आहे. त्या पृष्टयर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञावली ३९ नियम १ (ब व क) नुसार प्रतिवादींनी

अशा प्रकारची भिती दाखवली तर त्यांनी तशी कृती करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाईचा आदेश पारित करण्याची तरतुद आहे.

६. तहसिलदार यांच्याकडील प्रकरणी मामलेदार अधिनियम कलम ५ नुसार त्याची स्वतंत्र चौकशी करण्याचे तहसिलदार यांना अधिकार आहेत. या प्रकरणातील हा आदेश प्रथम दर्शनी पुराव्यावर आधिारित देण्यात येत आहे. तहसिलदार हे त्यांच्या समोरील प्रकरणामध्ये प्रत्यक्ष जागेवर जावून वस्तुस्थिती पाहून त्या आधारे निर्णय देत असतात. सबब, या आदेशाचा कसलाही प्रभाव तहसिलदार यांनी करुन घेवू नये, त्यांनी दावा मिळकतीमध्ये वस्तुस्थिती काय आहे याची स्वतंत्र पाहणी करुन त्याप्रमाणे योग्य तो निर्णय घ्यावा असे स्पष्ट करण्यात येते.

७. नि.दि.दा.क्र. १२८/२०१५ मध्ये तुर्तातुर्त मनाईचा अर्ज जरी फेटाळण्यात आला असला तरी देखील त्याची अंमलबजावणी ही केवळ त्या दाव्यातील अंतिम निकालापर्यंत असते. हा दावा दिनांक २१/०४/२०१८ रोजी फेटाळण्यात आला आहे. त्यामुळे त्या प्रकरणातील तुर्तातुर्त मनाई अर्जावरील आदेशाचा अंमल दिनांक २१/०४/२०१८ रोजीच संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे तुर्तातुर्त मनाई अर्जावरील हा आदेश आज पावेतो कायम आहे असे म्हणता येणार नाही.

८. वर नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जे वहिवाट आहे. दावा मिळकतीच्या सरबांधावरुन प्रतिवादी म्हणतात त्याप्रमाणे रस्ता अस्तित्वात

असल्याबाबतचा कसलाही कागदोपत्री पुरावा याकामी दिसून येत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी बोलल्याप्रमाणे दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा केल्यास वादीच्या दावा मिळकत संदर्भातील अधिकारास बाधा, हानी निर्माण होणार आहे. सबब या प्रकरणी वादीस सकृत दर्शनी प्रकरण आहे असे मला वाटते. परिणामी, मी या मुद्दयाचा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दे क्र. २ व ३ करीता

९. दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जे वहिवाट आहे असे प्रथम दर्शनी दिसून येते. दावा मिळकतीच्या सरबांधावरुन रस्ता असल्याबाबत कसलाही कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही. त्यामुळे सोईचा समतोल वादीच्या वतीने आहे असे मला वाटते. हा अर्ज फेटाळल्यास, प्रतिवादींनी कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब न करता अन्य बेकायदेशीर मार्गाने वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा केल्यास अथवा दावा मिळकतीमध्ये नवीन रस्ता निर्माण केल्यास वादीचे कशानेही न भरुन येणार अपरिमीत असे नुकसान होणार आहे. याउलट तहसिलदार यांच्या समोर असलेल्या प्रकरणी तहसिलदार हे स्वतः जागेवर जावून रस्ता अस्तित्वात आहे किंवा नाही याची प्रत्यक्ष पाहणी करुन त्याकामी स्वतंत्रपणे योग्य ते निर्णय घेतील असे अपेक्षित आहे. तहसिलदार यांनी त्यांच्या समोरील प्रकरणामध्ये या प्रकरणातील आदेशाचा विचार करायचा नाही हे स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशामुळे तहसिलदार यांच्या समोरील प्रकरणामध्ये कोणताही अडथळा निर्माण होणार नाही. त्यामुळे हा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होईल

असे मला वाटत नाही. सबब, मी मुद्दे क्रमांक २ व ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. ४ करीता

१०. मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी असल्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी दाव्याच्या अंतिम निकालापावेतो कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय दावा मिळकतीमधील वादीच्या वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत व अडथळा करु नये तसेच दावा मिळकतीमध्ये नवीन रस्ता तयार करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश पारित करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

GIRISH SUDARSHAN MANE
Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2022.03.25 16:24:47 +0530

स्थळ : कोरेगाव
दिनांक : २५/०३/२०२२

दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.